SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004, MAHARASHTRA
PHONE :EPABX- 2609000, (Inquiry Cell) 2609143, (EST) 2609097, 98, 99
FAX :0091-0231-2691533 & 0091-02312692333
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416 004 महाराष्ट्र
दूरध्वनी : (ईपीएबीएक्स)2609000, (चौकशी कक्ष), 2609143 (राष्ट्रीय सेवा योजना),2609176
फॅक्स : 0091–0231–691533 व 0091 – 0231–2692333
Estd : 1962
NAAC 'A' Grade

18/10/2020

सदर्भ.जा.क्र./शिवाजी वि./रा.से.यो./ई–मेलद्वारे

दि. 15/10/2020

प्रति,
मा. प्राचार्य / प्राचार्या
आर्टस कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज,
गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

विषय : परीक्षा प्रक्रियेदरम्यान संबंधित परीक्षा केंद्र / महाविद्यालयीन परीसरामध्ये आरोग्य दक्षता उपक्रम राबविणेस अनुसरून आपल्या महाविद्यालयातील प्रा. डी. जी. चिघळीकर यांची कोल्हापूर जिल्हा नोडल अधिकारी म्हणून निवड झालेविषयी.......

मा. महोदय / महोदया,

वरील विषयान्वये शिवाजी विद्यापीठाच्या मार्च / एप्रिल, 2020 उन्हाळी सत्रातील अंतिम वर्ष / अंतिम सत्राच्या परीक्षा ऑनलाईन / ऑफलाईन पध्दतीने दिनांक 17 ऑक्टोबर, 2020 पासून सुरु होत आहेत. या अनुषंगाने मा. उच्च व तंत्र शिक्षण मंत्रीमहोदय नामदार श्री उदय सामंत यांनी विद्यापीठामध्ये झालेल्या आढावा बैठकीमध्ये परीक्षा केंद्रावर कोव्हीड – 19 विषाणू संसर्गाचा फैलाव होवू नये म्हणून स्थानिक प्रशासनामार्फत योग्य त्या उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. यास अनुसरून शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात येणा–या सर्व संलग्नित महाविद्यालय / संस्था मध्ये निर्जंतुकीकरण करणे, अनावश्यक गर्दी टाळणे, सामाजिक अंतराचे पालन करणे इ. बाबत सुचना दिलेल्या आहेत तसेच परीक्षार्थींना कोरोनाचा संसर्ग होवून नये याकरीता विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्हा अंतर्गत संबंधित महानगरपालिका, नगरपरीषद, स्थानिक स्वराज्य संस्था यांचेमार्फत परीक्षा केंद्र / महाविद्यालयीन परीसराचे आरोग्याच्या दृष्टीने निर्जुंतीकरण, स्वच्छता व आपत्ती व्यवस्थापन कायद्याअंतर्गत इतर आवश्यक परवानगी इ. बाबत योग्य ते निर्देश देवून अनुषंगिक कार्यवाही करणे आवश्यक आहे.

याकरीता विद्यापीठ संलग्न प्रत्येक महाविद्यालयाद्वारे आरोग्य दक्षता उपक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे अनिवार्य असल्याने याकामी विद्यापीठ प्रशासनाद्वारे आपल्या महाविधालयातील प्रा. डी. जी. चिघळीकर यांची कोल्हापूर जिल्हा आरोग्य दक्षता – जिल्हा नोडल अधिकारी म्हणून निवड करणेत आलेली आहे त्याबद्दल विद्यापीठाच्या वतीने आपले मनःपूर्वक अभिनंदन.

आपल्या महाविद्यालयातील प्रा. डी. जी. चिघळीकर यांनी यापुढे रासेयो संचालक तथा आरोग्य दक्षता उपक्रम मुख्य समन्वयक श्री अभय जायभाये यांचे मार्गदर्शनाखील कोल्हापूर जिल्हा नोडल अधिकारी म्हणून काम करावयाचे असून याकामी कोल्हापूर जिल्हयातील सर्व महाविद्यालयीन /परीक्षा केंद्र नोडल अधिकारी यांचा व्हॉटस् ॲप ग्रुप आणि गुगल फॉर्म तयार करणेसह आवश्यकतेनुसार कोल्हापूर जिल्हयातील महाविद्यालयीन /परीक्षा केंद्रावरील आरोग्य दक्षता उपक्रमाचे निरीक्षण, पाहणी व अनुषंगिक कार्यवाहीकरीता संबंधित परीक्षा केंद्र / महाविद्यालय येथे उपस्थित रहावयाचे आहे. याबाबत विद्यापीठाच्या परीक्षा प्रक्रियेचे कामकाज संपन्न होईपर्यंत सदर आरोग्य दक्षता उपक्रमास अनुसरून प्रा. डी. जी. चिघळीकर वेळोवेळी आवश्यकतेनुसार कर्तव्य रजा मंजूर करणेसह वरीलप्रमाणे आवश्यक कार्यवाही त्वरीत करणेबाबत आपल्या स्तरावरून उचित निर्देश देणेत यावेत ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

(प्रा. अभय जायभाये)
संचालक, रासेयो

रवाना प्रा. चिघळीकर
16.10.2020

D:\SUBMISSION 2015-16\CIRCULAR - University Letter Head - Pg.792